मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# महापालिकेने प्रसिद्ध केलेल्या प्रभागनिहाय मतदार यादीवरून गोंधळ

## माजी नगरसेवकांकडून 5,000 हून अधिक तक्रारी : फक्त 333 मतदारांनीच 'नाम गायब' झाल्याबद्दल नोंदवली हरकत!

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेने प्रसिद्ध केलेल्या प्रभागनिहाय मतदार यादीवरून गोंधळ सुरू आहे. एका प्रभागातील मतदारांची नावे दुसऱ्या प्रभागात जोडण्यात आले आहेत. काही माजी नगरसेवक तसेच, उमेदवारांची नावे गायब झाली आहे. त्यावर राजकीय नेते, माजी नगरसेवक, इच्छुकांनी मोठ्या संख्येने हरकती व तक्रारी नोंदविल्या आहेत. मात्र, निवडणुकीतील महत्त्वाचा घटक असलेला मतदारराजा त्याबाबत उदासीन असल्याचे चित्र आहे. हरकती व तक्रारीकडे सर्वसामान्य मतदारांनी साफ दुर्लक्ष केले आहे. शहराचे भवितव्य ठरविणाऱ्या निवडणुकीबाबत मतदारांना काही देणे- घेणे नसल्याचे त्यावरून दिसत आहे महापालिका निवडणूक जानेवारी 2026 ला होण्याची शक्यता आहे. त्यासाठी 1 ते 32 प्रभागातील एकूण 128 जागांवर माजी

नगरसेवकांसह इच्छुक प्रचारात व्यस्त आहेत. निवडणुकीसाठी महापालिकेने प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी 20 नोव्हेंबरला प्रसिद्ध केली आहे.. इच्छुकांनी मतदार यादी विकत घेत प्रभागातून गायब झालेली मतदार नावे शोधून काढली आहेत. त्यावर महापालिकेच्या निवडणूक विभागाकडे हरकती दाखल करण्यात आल्या आहेत. ते प्रमाण शनिवार (दि.29) पर्यंत तब्बल सव्वापाच हजारांच्या पुढे गेले आहे. पुढील तीन दिवसात बुधवार (दि.3) पर्यंत ती संख्या मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. मतदारांना मतदान करता यावे म्हणून आपल्या फायद्यासाठी माजी नगरसेवक व इच्छुक धडपड करीत आहेत. गायब झालेली मते आपल्याला मिळावी यासाठी ते मेहनत घेत आहेत. त्यासाठी महापालिका प्रशासनाशी भांडत आहेत. निवडणुकीत एक- एक मत हे महत्वाचे असते. इच्छुक मतांसाठी सर्व प्रकाराचे प्रयत्न करताना दिसत आहेत.

असे असले तरी, निवडणुकीतील महत्वाचा घटक असलेला शहरातील मतदार राजा या प्रक्रियेपासून अलिप्त आहे. सर्वसामान्य मतदार आपले नाव मतदार यादीत आहे किंवा नाही, याबाबत सजग असल्याचे दिसत नाही. शहरातील केवळ 333 मतदारांनी आपले नाव मतदार यादीत नाही, यासाठी अ अर्ज भरला आहे. प्रत्येक प्रभागात अंदाजे किमान 2 हजार मतदारांची नावे दुसऱ्या प्रभागात जोडण्यात आली आहेत. त्यानुसार तब्बल 64 हजारांपेक्षा अधिक मतदारांची नावे दुसऱ्या प्रभागात समाविष्ट करण्यात आली आहेत. प्रत्यक्षात ती संख्या अधिक आहे. त्यानुसार प्रत्येक मतदारांने मतदार यादी तपासून हरकती नोंदविणे अपेक्षित होते. मात्र, तसे झालेले नाही. त्यामुळे शहराचे भवितव्य ठरविणार्या निवडणुकीबाबत मतदारांना काही घेणे देणे नसल्याचे दिसत आहे.




### नागरिकांनी नाव मतदार यादीत तपासून घ्यावे

**» आपण राहत असलेल्या प्रभागातील मतदार यादीत नाव नसल्यास संबंधित मतदारांने अर्ज अ भरून द्यावा. त्यावर योग्य ती कार्यवाही केली जाईल. हरकत, तक्रार, सूचना तसेच, फॉर्म भरून देण्याची बुधवार (दि.3) पर्यंत मुदत आहे. त्यानंतर महापालिका कोणताही तक्रार स्वीकारणार नाही, असे महापालिकेने अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यंनी सांगितले.**

---

# भोसरी एमआयडीसीतील एका कंपनीत एलपीजी सिलेंडरचा स्फोट

## सहा कामगार जखम; अग्निशमन विभागाने परिस्थिती आणली नियंत्रणात

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील भोसरी एमआयडीसी परिसरातील अंबिका पावडर कोटिंग कंपनी मध्ये एलपीजी (लिक्विफाइड पेट्रोलियम गॅस) अचानक स्फोट होऊन आग लागल्याची घटना घडली. घटनेची माहिती मिळताच पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अग्निशमन विभागाच्या पथकाने घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली आहे. दरम्यान, या घटनेत १ कामगार गंभीर तथा ५ कामगार किरकोळ जखमी झाले असून प्रथमोपचारानंतर पुढील वैद्यकीय उपचाराकरिता रुग्णालयात रवाना करण्यात आले आहे.

कंपनीमध्ये अचानक मोठा स्फोट होऊन आग लागली, व स्फोटाच्या मोठ्या आवाजाने तथा आगीच्या उंच ज्वाला तसेच धूर पसरू लागल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. याबाबतची माहिती परिसरातील नागरिकांनी तातडीने अग्निशमन विभागाला दिली.

घटनेची माहिती मिळताच मुख्य अग्निशमन केंद्र पिंपरी, नेहरूनगर उप अग्निशमन केंद्र आणि भोसरी उप अग्निशमन केंद्र येथील पथके तात्काळ घटनास्थळी दाखल झाली. अग्निशमन विभागाच्या पथकाने परिस्थितीचा आढावा घेत जलदगतीने बचावकार्य सुरू केले. धूर आणि उष्णतेमुळे उद्भवणारा पुढील धोका लक्षात घेऊन, पथकाने सर्व जागांची पाहणी करून कंपनीतील कामगारांना सुरक्षित बाहेर काढत परिस्थिती नियंत्रणात आणली. या घटनेत सुनील कुमार( गंभीर जखमी), दाऊ कुमार, सुड्डु जयस्वाल, सुरज जाटो, राहुल कुमार, रोहित कुमार हे कामगार जखमी झाले आहेत.

या कार्यवाहीमध्ये उप अग्निशमन अधिकारी गौतम इंगवले, दिलीप गायकवाड यांच्यासह ३० अग्निशामक जवान सहभागी होते. अग्निशामक पथकांनी एकत्रित समन्वयाने बचाव व अग्निशमन कार्य सुरळीतपणे पाडले. या स्फोटाचे नेमके कारण अद्याप समोर आले नसून अग्निशमन विभाग आणि संबंधित अधिकाऱ्यांकडून पुढील तपास सुरू करण्यात आला आहे.



> **औद्योगिक क्षेत्रातील कामकाजात सुरक्षा मानकांचे काटेकोर पालन न करणे ही अनेक दुर्घटनांची प्रमुख कारणे आहेत. नियमित तपासणी, उपकरणांची देखरेख आणि कामगारांना दिले जाणारे सुरक्षा प्रशिक्षण हे घटक दुर्लक्षित झाले तर असे प्रकार पुन्हा घडू शकतात. त्यामुळे औद्योगिक सुरक्षेला प्राधान्य देणे महत्वाचे आहे.**
>
> **- विजयकुमार खरोटे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड, महापालिका**

# औंध जिल्हा रुग्णालयात रोबोटिक गुडघा प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वी!

## आरोग्य सेवेतील महत्वाकांक्षी टप्पा; गरजू रुग्णावर अत्याधुनिक पद्धतीने मोफत शस्त्रक्रिया

**सांगवी | प्रतिनिधी**

औंध जिल्हा रुग्णालयाने सार्वजनिक आरोग्य सेवेच्या इतिहासात एक अभूतपूर्व आणि दुर्मिळ कामगिरी नोंदवली आहे. जिल्हा रुग्णालयात प्रथमच तसेच शासकीय रुग्णालयांच्या स्तरावर पथदर्शी ठरणाऱ्या रोबोटिक्स-असिस्टेड टोटल नी रिप्लेसमेंट (TKR) शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पडली. यामध्ये रोबोटच्या सहाय्याने गुडघा प्रत्यारोपण करण्यात आले.

ही अत्याधुनिक शस्त्रक्रिया एकात्मिक आयुष्मान भारत, प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना या शासनाच्या कल्याणकारी योजनांतर्गत संपूर्णपणे मोफत करण्यात आली. यामुळे शस्त्रक्रिया झालेल्या रुग्णाला एकाही रुपया खर्च न करता अद्ययावत उपचार मिळाले.

बारामतीचे तुलशीराम कोंडे (वय ६७) हे या शस्त्रक्रियेचे लाभार्थी ठरले. त्यांच्यावर रोबोटिक्स-असिस्टेड टोटल नी रिप्लेसमेंट या गुंतागुंतीच्या मानल्या जाणाऱ्या शस्त्रक्रियेचा प्रयोग यशस्वी झाला. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नागनाथ यमपल्ले यांच्या नेतृत्वाखाली तज्ज्ञ डॉक्टरांच्या चमूने ही कामगिरी साधली. यामध्ये वरिष्ठ अस्थिरोगतज्ज्ञ आणि विभाग प्रमुख डॉ. अनिल संतपुरे, तसेच डॉ. महेंद्र गरड, डॉ. अमित बनशेळकीकर, डॉ. अनिल बिऱ्हाडे, डॉ. किरण खलाटे, डॉ. केशव गुंठे, डॉ. बालाजी कदम, डॉ. जयश्री मनोट यांचा सक्रिय सहभाग होता.

या ऐतिहासिक कामगिरीबद्दल जिल्हा रुग्णालय, पुणे येथील संपूर्ण अस्थिरोग विभाग, रोबोटिक शस्त्रक्रिया तज्ज्ञ, भूलतज्ज्ञ, नर्सिंग स्टाफ तसेच आयुष्मान भारत आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेच्या टीमचे विशेष कौतुक होत आहे. त्यांचा सेवाभावी दृष्टिकोन आणि तांत्रिक कौशल्ये यामुळेच हे यश शक्य झाले आहे. पुढील काळात अशा अत्याधुनिक सेवा ग्रामीण आणि शहरी भागातील अधिक रुग्णांना लाभदायी ठरतील, ज्यामुळे सार्वजनिक आरोग्य विभागावरील विश्वास आणखी वाढेल अशी आशा व्यक्त केली जात आहे.




### सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेसाठी क्रांतिकारी पाऊल

» जिल्हा रुग्णालय स्तरावर रोबोटिक्स-असिस्टेड TKR ची सुरुवात होणे, हे सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेसाठी एक 'क्रांतिकारी पाऊल' मानले जात आहे.नाहा केवळ उपक्रम नाही, तर आरोग्य सेवांचे लोकशाहीकरण करण्याच्या दिशेने टाकलेला एक महत्त्वाचा टप्पा आहे. आयुष्मान भारत आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनांमुळे गरीब आणि गरजू नागरिकांनाही अशा आधुनिक, महागड्या शस्त्रक्रिया विनामूल्य मिळू शकतात, हे या कामगिरीने सिद्ध केले आहे.

### शस्त्रक्रियेची वैशिष्ट्ये

» या अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे गुडघ्याच्या सांध्यातील विकृती अत्यंत नेमकेपणाने दुरुस्त करून कृत्रिम सांधा बसवता येतो. रोबोटिक सहाय्यामुळे हाडांचे कट्स अधिक अचूक होतात. रुग्णांना शस्त्रक्रियेनंतर होणाऱ्या वेदना कमी होतात आणि रक्तस्राव व इतर गुंतागुंत होण्याचा धोका लक्षणीयरीत्या कमी राहतो. मृदू ऊतींचे नुकसान कमी झाल्याने रुग्णाच्या चालण्यात सुधारणा होते आणि पुनर्वसनाचा कालावधी कमी होतो.

"आरोग्य सेवा अधिक बळकटपणे सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर नेहमीच आम्हाला प्रोत्साहित करत असतात. यामध्ये तज्ज्ञ डॉक्टरांची टीम आणि रुग्णांचा विश्वास यातून असे महत्वाचे पल्ले गाठणे आम्हाला शक्य होते."

- डॉ. नागनाथ यमपल्ले, जिल्हा शल्यचिकित्सक, औंध जिल्हा रुग्णालय

"सांधे रोपण, गुडघे प्रत्यारोपण यासारख्या नैमित्तिक शस्त्रक्रिया आमच्या येथे केल्या जातात. रोबोटिक शस्त्रक्रिया हे अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे सहाय्य असले तरी, यासाठी मानवी कौशल्य आवश्यक असते. हा प्रयोग यशस्वी होण्याचे श्रेय डॉ. यमपल्ले आणि जिल्हा रुग्णालयातील सक्षम आणि सेवाभावी आरोग्य सेवक यांना जाते."

- डॉ. अनिल संतपुरे, वरिष्ठ अस्थिरोग तज्ज्ञ, विभाग प्रमुख, औंध जिल्हा रुग्णालय

# मावळातील दळणवळण सुलभ होणार; उद्योग, पर्यटनाला चालना मिळणार..!

## मळवली, कान्हे रेल्वे स्थानकांजवळील उड्डाणपुलाच्या कामाचे खासदार श्रीरंग बारणे यांच्या हस्ते भूमिपूजन

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ लोकसभा मतदारसंघातील शहरी, ग्रामीण भागात विस्तारलेल्या मावळ विधानसभा मतदारसंघात रस्त्यांसह रेल्वेमार्गावर भुयारी पूल, उड्डाणपुलाची कामे प्रगतीपथावर आहेत. मळवली आणि कान्हे रेल्वे स्थानक उभारण्यात येणाऱ्या पुलामुळे टाकवे एमआयडीसी, भाजे लेणी, लोहगड, विसापूर किल्ल्याकडे जाणे सोपे होणार आहे. यामुळे उद्योग, पर्यटनाला चालना मिळेल असा विश्वास शिवसेनेचे खासदार श्रीरंग बारणे व्यक्त केला. मळवली आणि कान्हे रेल्वे स्थानक क्रॉसिंगवरील वाहतूक कोंडी सुटणार असल्याने स्थानिकांना मोठा दिलासा मिळेल, असेही ते म्हणाले.

खासदार श्रीरंग बारणे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याने मळवली आणि कान्हे रेल्वे स्थानक क्रॉसिंगवर उड्डाणपूल उभारण्यास रेल्वेने मान्यता दिली. या दोन्ही पुलाच्या कामाचे भूमिपूजन खासदार बारणे यांच्या हस्ते शनिवारी करण्यात आले. त्यावेळी बारणे बोलत होते. यावेळी आरपीआय पक्षाचे नेते सूर्यकांत वाघमारे, शिवसेना जिल्हाप्रमुख राजाभाऊ खांडभोर, भाजपा महिला जिल्हाअध्यक्ष सायली बोत्रे, भाजपा प्रदेश सचिव जितेंद्र बोत्रे, शिवसेना जिल्हा संघटक अंकुश देशमुख, शिवसेना उप जिल्हाप्रमुख शरदराव हुलावळे, युवासेना उपजिल्हा प्रमुख दत्ता केदारी, शिवसेना मावळ तालुकाप्रमुख राम सावंत, आरपीआय पक्षाचे मावळ तालुका अध्यक्ष लक्ष्मण भालेराव, शिवसेना महिला मावळ तालुका प्रमुख शुभांगी काळंगे, एकवीरा देवी देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष दिपक हुलावळे, माजी जिल्हा परिषद सदस्य गणेश धणिवले, युवासेना मावळ लोकसभा अध्यक्ष विशाल हुलावळे, शिवसेना मावळ उपतालुका प्रमुख अमित कुंभार, देहूगाव शहरप्रमुख सुनिल हगवणे, मळवली ग्रामपंचायत सरपंच गणेश तिकोने, दिलीप महाराज खंगणे, सागर हुलावळे, बाळासाहेब आंबेकर, मुन्ना मोरे, नवनाथ हरपुडे, मदन शेडगे, नितीन देशमुख बाळासाहेब भानूजगरे, सहादु बडेकर, खंडू शेलार व मोठ्या संखेने ग्रामस्थ उपस्थित होते.



### मळवली आणि कान्हे उड्डाणपूल..

» मळवली उड्डाणपुलात एकूण ३२ फाउंडेशन्स असून त्यात ३ अबूटमेंट्स आणि २९ पिअर्स समाविष्ट आहेत. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून ६४ मीटरचा १ मुख्य गर्डर (रेल्वे ट्रॅकवर) आणि १५ मीटर लांबीचे ३० गर्डर्स रस्त्यासाठी बसविण्यात येणार आहेत. उड्डाणपुलावर १२ मीटर (४० फूट) एकूण रस्त्याची रुंदी आहे. संपूर्ण उड्डाणपुलाची एकूण लांबी ६०० मीटर आहे. यासाठी अंदाजित ५३ कोटी रुपयांचा खर्च येणार आहे. कान्हे उड्डाणपुलात एकूण ५ फाउंडेशन्स असून त्यात २ अबूटमेंट्स आणि ३ पिअर्स समाविष्ट आहेत. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून ३६ मीटरचा १ मुख्य गर्डर. १८ मीटर लांबीचे २ गर्डर्स आणि १२ मीटरचा १ गर्डर रेल्वे ट्रॅकवरून जाणाऱ्या रस्त्यासाठी बसविण्यात येणार आहेत. उड्डाणपुलावर १२ मीटर (४० फूट) एकूण रस्त्याची रुंदी आहे. उड्डाणपुलाची एकूण लांबी ४७० मीटर आहे. त्यासाठी अंदाजित ४३ कोटी रुपयांचा खर्च येणार आहे.

# मतदार यादीचा सावळागोंधळ! आयुक्त म्हणतात 'दुरुस्ती करा', पण कर्मचारी म्हणतात 'पुरावे आणा'

## मतदार यादीत दुरुस्ती करण्याचे अधिकार महापालिका आयुक्तांना असल्याचे थेट आदेशच काढले.

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिका निवडणुकासाठी जाहीर केलेल्या प्रभाग निहाय मतदारयादीत अनेक ठिकाणी मतदारांची पळवा पळवी झाली आहे. त्यावरून निवडणूक आयोग, महापालिकेवर सत्ताधाऱ्यांना मदत केल्याचा आरोप झाल्यानंतर निवडणूक आयोगाने मतदार यादी तक्रारीवर सुमोटो ( स्वत: हून) कारवाई करावी असे स्पष्ट केले. तसेच मतदार यादीत दुरूस्ती करण्याचे अधिकार महापालिका आयुक्तांना असल्याचे थेट आदेशच काढले.

त्यानुसार, आयुक्तांनी बैठक घेत सर्व क्षेत्रीय कार्यालयांनी अशा तक्रारींची दखल घेत याद्यांची तातडीने दुरूस्ती करण्याचे आदेश दिले. प्रत्यक्षात दुरूस्तीच्या तपासणीसाठी गेलेले कर्मचारी तक्रारदाराला यादीत इतर प्रभागातून आलेले मतदार आणि इतर प्रभागात गेलेले मतदारांची आधारकार्डे आणून द्या, तरच दुरूस्ती केली जाईल असे सांगत आहेत.



अशा प्रकारे आपली जबाबदारी मतदारांवर ढकलण्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. त्यामुळे आयुक्तांच्या आदेशाला केराची टोपली दाखविली जात असून निवडणूक आयोगाचा आदेशही धुडकावला जात असल्याचे दिसते. प्रभाग ३५ मध्ये हा प्रकार उघडकीस आला आहे.प्रभाग ३५ सनसिटी माणिकबाग मधील सुमारे २ ते ३ हजार मतदान प्रभाग ३४ नऱ्हे-वडगाव- धायरी या प्रभागात दाखविण्यात आले आहे.

प्रत्यक्षात या प्रभाग ३५ मधील जे मतदार इतर प्रभागात दर्शविण्यात आले आहेत, त्यांचे नाव, पत्ता, तसेच इतर कोणत्याही माहितीत

बदल झालेला नाही. तसेच विधानसभा निवडणुकीतही त्यांनी या भागात मतदान केले होते. त्यामुळे, या प्रकाराची तक्रार करण्यासाठी माजी नगरसेविका मंजूषा नागपूरे यांनी तक्रार केली. त्यावेळी तक्रार घेवुन गेलेल्या कार्यकर्त्यांना कर्मचाऱ्यांकडून उडवाउडवीची उत्तरे देत सर्व मतदारांची आधारकार्ड घेवून येण्याच्या सूचना दिल्या. आधारकार्ड असेल तरच तक्रार घेतली जाईल असे सांगत माघारी पाठवून देण्यात आले.

महापालिका निवडणुकासाठी जाहीर केलेल्या प्रभाग निहाय मतदारयादीत अनेक ठिकाणी मतदारांची पळवा पळवी झाली आहे. त्यावरून निवडणूक आयोग, महापालिकेवर सत्ताधाऱ्यांना मदत केल्याचा आरोप झाल्यानंतर निवडणूक आयोगाने मतदार यादी तक्रारीवर सुमोटो ( स्वत: हून) कारवाई करावी असे स्पष्ट केले. तसेच मतदार यादीत दुरूस्ती करण्याचे अधिकार महापालिका आयुक्तांना असल्याचे थेट आदेशच काढले.

### आधारकार्ड असेल तरच तक्रार घेतली जाईल

» **प्रत्यक्षात या प्रभाग ३५ मधील जे मतदार इतर प्रभागात दर्शविण्यात आले आहेत, त्यांचे नाव, पत्ता, तसेच इतर कोणत्याही माहितीत बदल झालेला नाही. तसेच विधानसभा निवडणुकीतही त्यांनी या भागात मतदान केले होते. त्यामुळे, या प्रकाराची तक्रार करण्यासाठी माजी नगरसेविका मंजूषा नागपूरे यांनी तक्रार केली. त्यावेळी तक्रार घेवुन गेलेल्या कार्यकर्त्यांना कर्मचाऱ्यांकडून उडवाउडवीची उत्तरे देत सर्व मतदारांची आधारकार्ड घेवून येण्याच्या सूचना दिल्या. आधारकार्ड असेल तरच तक्रार घेतली जाईल असे सांगत माघारी पाठवून देण्यात आले.**

> **"याद्याचे विभाजन क्षेत्रीय कार्यालयाच्या कर्मचाऱ्यांनी केले आहे. त्यांची चूक असतानाही आम्ही तक्रार केली, तर आम्हालाच पुरावे मागण्यात येत आहे. निवडणूक आयोगाने स्पष्टपणे सूचना केल्यानंतरही चुकीच्या पध्दतीने निवडणूक कर्मचारी अडवणूक करत आहेत. ही बाब अतिशय गंभीर आहे."**
>
> **- मंजूषा नागपुरे (माजी नगरसेविका)**

> **"तक्रार आल्यानंतर स्वत:हून त्यात तपासणी करून बदल करण्याच्या सूचना सर्व क्षेत्रीय कार्यालयांना दिल्या आहेत. अशा प्रकारे अडवणूक झालेली असल्यास तातडीनं चौकशी केली जाईल, तसेच कारवाई केली जाईल."**
>
> **- प्रसाद काटकर ( निवडणूक विभाग प्रमुख)**

# नऱ्हेतील 'तो' मार्ग कायमस्वरूपी बंद, वाहतूक विभागाचा मोठा निर्णय

## नऱ्हेतील मानाजीनगर येथून मुंबई-बेंगळुरू राष्ट्रीय महामार्गावर जाणारा प्रवेश कायमस्वरूपी बंद करण्यात आला

**पुणे | प्रतिनिधी**

नवले पुलाजवळील वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर वाहतूक विभागाने मोठा निर्णय घेतला आहे. नऱ्हेतील मानाजीनगर येथून मुंबई-बेंगळुरू राष्ट्रीय महामार्गावर जाणारा प्रवेश कायमस्वरूपी बंद करण्यात आला असून, गुरुवार पासून हा आदेश अंमलात आणण्यात आला आहे. धोकादायक रस्त्याची रचना आणि अपघातांची सतत वाढ ही निर्णयाची मुख्य कारणे आहेत.

अलीकडेच झालेल्या भीषण अपघाताने नवले पुल परिसरातील वाहतूक समस्या पुन्हा अधोरेखित केल्या आहेत. गेल्या काही महिन्यांपासून हा जोडरस्ता अपघातप्रवण ठिकाण ठरला होता. स्थानिक नागरिक, प्रवासी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी सतत तातडीची कारवाई करण्याची मागणी केली होती. त्यानंतर वाहतूक विभागाने मानाजीनगर (नऱ्हे) येथून महामार्गावर जाणारा प्रवेशद्वार कॉंक्रीटने बंद केला आहे, त्यामुळे आता वाहने थेट या मार्गाने हायवेवर जाऊ शकणार नाहीत.



नव्या व्यवस्थेनुसार, मानाजीनगर, नऱ्हे, धायरी आणि आसपासच्या परिसरातील वाहनचालकांना हायवेवर जाण्यासाठी स्वामिनारायण मंदिराजवळील सर्विस रस्ता वापरावा लागणार आहे. अधिकाऱ्यांच्या मते, या नवीन मार्गामुळे धोकादायक मर्जिंग पॅटर्न कमी होऊन अपघात टाळता येतील. याशिवाय, जांभुळवाडी तलावाजवळील जुन्या मार्गांमधून हॉटेल आणि लॉज परिसरात जाणारे दोन रस्तेही कायमस्वरूपी बंद करण्यात आले आहेत. सतारा बाजूकडून नवले पुलाकडे जाणाऱ्या या रस्त्यांवरून उलट दिशेने वाहन चालवण्याचे प्रमाण वाढले होते, ज्यामुळे मोठा धोका निर्माण झाला होता. सुरक्षा वाढवण्यासाठी आणि नियमभंग टाळण्यासाठी हे रस्ते बंद करणे आवश्यक असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

### नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन

» **स्वामिनारायण मंदिराजवळील सर्विस रस्त्यावर आता काही काळ वाहतूक वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. नागरिकांना संयम ठेवण्याचे आणि नव्या व्यवस्थेला सहकार्य करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. अनेक नागरिकांच्या मते, सुरक्षित वाहतुकीच्या दिशेने हा निर्णय पहिला आणि महत्त्वाचा टप्पा आहे. नवले ब्रिज मार्ग नियमितपणे वापरणारे राजेश बोबडे म्हणाले, "रस्ता बंद केल्याने मदत होईल, पण ते पुरेसे नाही. संपूर्ण मार्गाचे पुनर्रचना आवश्यक आहे. अपघात टाळण्यासाठी उड्डाणपूल, स्वतंत्र लेन व्यवस्थापन यांसारख्या दीर्घकालीन उपाययोजना हव्यात."**

# भोर नगरपालिकेच्या आखाड्यात 'पॉवर प्ले'!

## तब्बल 140 वर्षांत प्रथमच मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्र्यांचा राजकीय अड्डा

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्याच्या राजकीय भूगोलात शांत समजल्या जाणाऱ्या भोर नगरपालिकेच्या निवडणुकीने यंदा खळबळ उडवून दिली आहे. सन १८८५ साली स्थापन झालेल्या, तब्बल १४० वर्षांचा इतिहास असलेल्या या पालिकेच्या निवडणुकीत पहिल्यांदाच राज्याचे दोन्ही सर्वोच्च नेते, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार, हे जाहीर सभांसाठी उतरत आहेत. यामुळे भोरच्या राजकीय वर्तुळात चांगलीच गरमी निर्माण झाली आहे.

महायुती सरकारचे घटक असूनही स्थानिक पातळीवर दोन्ही पक्षांमध्ये जोरदार संघर्ष पाहायला मिळत आहे. नगराध्यक्षपदासह नगरसेवकपदासाठी भारतीय जनता पार्टी (भाजप) आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात सरळ लढत होत आहे.

अन्य पक्ष: सहा अपक्ष, दोन शिवसेना आणि एक काँग्रेस उमेदवारही आपले नशीब आजमावत आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांची जाहीर सभा आज, ३० नोव्हेंबर रोजी संत गाडगे महाराज प्राथमिक शाळा मैदान येथे होणार आहे. तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची जाहीर सभा उद्या, १ डिसेंबर रोजी दुपारी दीड वाजता जिजामाता इंग्लिश मीडियम स्कूल येथे होणार आहे.

राज्याच्या सत्तेत एकत्र असणारे हे दोन्ही नेते भोरच्या जाहीर सभेत एकमेकांवर टीका करणार की, राजकीय 'सामंजस्य' दाखवणार, याकडे मतदारांचे लक्ष लागले आहे. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या सभांमुळे दोन्ही पक्षांकडून विजयासाठी जोरदार मोर्चेबांधणी आणि शक्तीप्रदर्शन केले जात आहे.

या निवडणुकीत भोर शहराच्या मूलभूत सुविधा (पाणी, स्वच्छता, आरोग्य, सांस्कृतिक भवन) आणि उत्रोली वडगाव औद्योगिक वसाहतीचा प्रलंबित प्रश्न कळीचा ठरला आहे. सुशिक्षित बेरोजगारांच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या या औद्योगिक वसाहतीच्या प्रश्नावर दोन्ही पक्षांकडून आश्वासनांची सरबत्ती केली जात आहे.

सन १८८५ साली स्थापन झालेल्या, तब्बल १४० वर्षांचा इतिहास असलेल्या या पालिकेच्या निवडणुकीत पहिल्यांदाच राज्याचे दोन्ही सर्वोच्च नेते, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार, हे जाहीर सभांसाठी उतरत आहेत. यामुळे भोरच्या राजकीय वर्तुळात चांगलीच गरमी निर्माण झाली आहे. नगराध्यक्षपदासह नगरसेवकपदासाठी भारतीय जनता पार्टी (भाजप) आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात सरळ लढत होत आहे.




### ब्रिटिशकालीन वारसा

» भोर नगरपालिकेची स्थापना १८८५ मध्ये झाली. माजी नगराध्यक्ष कै. अमृतलाल रावळ यांनी १९६९ ते १९९३ या काळात तब्बल २४ वर्षे या पालिकेवर निर्विवाद वर्चस्व ठेवले होते. त्यानंतर १९९३ पासून या जागेवर काँग्रेसचा प्रभाव राहिला.

### भाजप विरुद्ध राष्ट्रवादी

» राज्याच्या सत्तेत एकत्र असणारे हे दोन्ही नेते भोरच्या जाहीर सभेत एकमेकांवर टीका करणार की, राजकीय 'सामंजस्य' दाखवणार, याकडे मतदारांचे लक्ष लागले आहे. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या सभांमुळे दोन्ही पक्षांकडून विजयासाठी जोरदार मोर्चेबांधणी आणि शक्तीप्रदर्शन केले जात आहे.

### दोन्ही पक्षांकडून आश्वासनांची सरबत्ती

» या निवडणुकीत भोर शहराच्या मूलभूत सुविधा (पाणी, स्वच्छता, आरोग्य, सांस्कृतिक भवन) आणि उत्रोली वडगाव औद्योगिक वसाहतीचा प्रलंबित प्रश्न कळीचा ठरला आहे. सुशिक्षित बेरोजगारांच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या या औद्योगिक वसाहतीच्या प्रश्नावर दोन्ही पक्षांकडून आश्वासनांची सरबत्ती केली जात आहे.

---

# सासवडचा सर्वांगीण विकास करण्यासाठी कटिबद्ध; भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे आश्वासन

## 142 कोटींची पाणी योजना आणि भूमिगत गटारं; सासवडच्या विकासाचा मेगाप्लॅन भाजपच्या सभेत जाहीर

**पुणे | प्रतिनिधी**

"सासवड शहर आधुनिक, सुव्यवस्थित आणि सर्व सुविधांनी युक्त करण्याचे स्वप्न आपण सर्वांनी पाहिले आहे. सासवडला स्मार्ट सिटीसारखे विकसित करण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मी स्वतः गळ घालणार आहे. सासवडचा सर्वांगीण विकास करण्यासाठी मी पूर्णपणे कटिबद्ध आहे."असे भाजपाचे प्रदेशाध्यक्ष व आमदार रवींद्र चव्हाण यांनी निवडणूक प्रचार सभेत केले.

सासवड (ता पुरंदर) येथे प्रचार सभेनिमित्त चव्हाण बोलत होते. ते चव्हाण म्हणाले,"देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची विकासाची धडाडी दिसून येते. भाजप जनसेवा आणि पारदर्शक प्रशासन याचे व्रत घेऊन काम करत आहे. काही जण निवडणुकीच्या काळात खोटी आश्वासने देतील, पण भाजप विकासाच्या कामावर विश्वास ठेवतो. नागरिकांना विक्रमी मताधिक्याने सर्व भाजप उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन केले.

"सासवडचा सर्वांगीण विकास, झोपडपट्टीमुक्त शहर आणि आधुनिक पायाभूत सुविधांची उभारणी हे आपले उद्दिष्ट आहे. त्यासाठी नागरिकांनी स्वर्गीय कै. चंदूकाका जगताप यांच्या विचारांना अनुसरून एकजुटीने उभे राहिले पाहिजे," असे आवाहन माजी आमदार संजय जगताप यांनी निवडणूक प्रचार सभेत केले.

गॅस, पाणी व गटार या तिन्ही लाईनी भूमिगत टाकण्याचा रस्त्यांच्या दुरुस्तीचा डीपीआरही अंतिम झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले. एक वर्षापासून जेजुरी आणि सासवडच्या पाणी प्रकल्पांसाठी वर्क ऑर्डर दिली गेली नाही, तसेच मागील काही महिन्यांत काहींच्या निष्क्रियतेमुळे शहराचे नियोजन बिघडल्याचा आरोपही त्यांनी केला. "अनेक अधिकारी आणि महापौरांनी सासवडला भेट देत प्रगतीची पाहणी केली आहे. आपल्याला जलद गतिने कामे पूर्ण करायची आहेत," असे ते म्हणाले.

सभेत बोलताना आमदार योगेश टिळेकर म्हणाले, "स्व. चंदूकाकांनी विकसित सासवडचे स्वप्न पाहिले. शहराची परंपरा दीडशे वर्षांची असून ते आंतरराष्ट्रीय दर्जाचे व्हावे, यासाठी संजय जगताप भाजपमध्ये आले." मुख्यमंत्री फडणवीस यांनी श्रीक्षेत्र आरणला 'अ' वर्ग तीर्थक्षेत्र घोषित केले, दोनशे कोटींचा विकास आराखडा मंजूर केला आणि महात्मा फुले यांना भारतरत्न देण्याचा ऐतिहासिक ठराव मांडला.




### सासवडसाठी 142 कोटी रुपयांची पाणी योजना

» जगताप म्हणाले की, "चंदूकाकांनी सर्वसामान्यांसाठी आयुष्यभर काम केले. त्यांच्या विचारांवर आधार घेऊन आपण प्रत्येक प्रभागातून आपला नगरसेवक निवडून द्यावा., "सासवड नगरपरिषद देशातील सर्वाधिक स्वच्छ नगरपरिषद ठरली असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शहराच्या विकासासाठी अनेक मोठ्या योजना मंजूर केल्या आहेत."जगताप यांनी सांगितले की, "मुख्यमंत्र्यांनी सासवडसाठी 142 कोटी रुपयांची पाणी योजना मंजूर केली असून पिंपळे आणि वाघडोंगर येथे प्रत्येकी दोन कोटी लिटर क्षमतेचे साठवण तलाव उभारले जातील."